



MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

मुंडेसाहेब
एक समर्पित
संघर्षयोध्दा



बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ अंक -२५१ | सोमवार दि.०३ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

# जातीचं विष पचविणारा माझा गोपीनाथ आज हवा होता

## जातीचा गणित बाजूला ठेवून राजकारण करणाऱ्या लोकनेते गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींना बीड सह भारत देशात श्रद्धांजली

## बीड जिल्ह्याच्या विकासासाठी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे मोठे योगदान

तर ४जूनचा निकाल जनतेने दिलेला कौल समजून पराजय झालेला असेल किंवा विजय उमेदवारांनी तो मान्य करत वेगवेगळ्या समाजाने शांतता राखणे गरजेचे.

- सुखा दुखात बीड जिल्ह्याच्या धावणारा माझा गोपीनाथ जिल्ह्यातील अठरापगड जातीच्या ह्रदयात.

- ऊसतोड मजुरांचा आवाज माझा गोपीनाथ आज हवा होता ऊसतोड माता भगिनींकडून स्वर्गीय गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींना उजाळा.



1. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब असते तर २०२४ ला एवढा जातिवाद झालाच नसता
2. बीड जिल्ह्यातील मुस्लिम बांधव हे भाजपला नव्हे तर गोपीनाथ मुंडे साहेबांना बघून मतदान करायचे
3. मोमीनपुरा बशीर गंज मुस्लिम वस्त्यांमध्ये मुंडे साहेबांच्या जाहीर सभा व्हायच्या कारण हमारे साहब म्हणून गोपीनाथ मुंडे साहेबांना मुस्लिम समाजाची साथ होती.

बीड प्रतिनिधी - स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब ३ जून २०१४ ला आपल्या सर्वांचे निघून गेले त्यांचे आणि निधना नंतर बीड जिल्ह्यातील खूप मोठी राजकीय पोकळी निर्माण झाली या राजकीय पोकळीला पूर्ण शंभर वर्ष बीड जिल्ह्यासह भारतामध्ये स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यासारखा दूरदृष्टी नेता कधीही पाहायला मिळणार नाही. त्याचं कारण म्हणजे १८ पगड जातील सोबत घेत असताना स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी ज्या कोणत्या सर्वसामान्य माणसाच्या कार्यकर्त्याच्या पाठीवर हात टाकला त्यां कार्यकर्त्याचं सोनं स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांनी केलं कारण सर्वसामान्य कार्यकर्ता ते बीडचा पालकमंत्री असेल किंवा महाराष्ट्रात केंद्रीय मंत्रिमंडळात आमदार मंत्री खासदार असेल अशांच्या पाठीवरती स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी कौतुकाचे थाप मारली तर त्या कार्यकर्त्याला संधीचं सोनं करण्याची संधी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्यामध्ये होते अनेक आमदार खासदार केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी उभा केले बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या पाठीशी ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीडच्या इतिहासाची नोंद असलेल्या याच बीड जिल्ह्याची ऊसतोड मजुरांचा जिल्ह्याचे कलंक लागलेला असताना हा कलंक पुसण्याचे काम स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी केलेला आहे सहकारामध्ये कारखानदार म्हणून आज मातब्दार पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांच्या विरोधामध्ये खंबीरपणे उभारून बीड जिल्ह्यामध्ये मराठवाड्यामध्ये साखर सम्राटांच्या छाताडावर बसून स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी स्वतः बीड जिल्ह्यातील अनेक कारखाने उभा करत सर्वसामान्य ऊस तोड मुजरांना न्याय देण्याचं काम यावेळी केलं तर याच पश्चिम महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांचा कंबरड मोडून माझ्या बीड जिल्ह्यातील जनतेच्या कष्टाच्या घामाच्या मजुरांच्या ऊस तोडणी करून कोट्यावधी रुपये कमवता तर माझा बीड जिल्हा हा आज माझ्यासाठी सर्वाधिक व त्या ऊसतोड मजूर आहेत त्यांच्यासाठी मी माझा आयुष्य समर्पित केले असाही दम पश्चिम महाराष्ट्रसह त्यांनी दिग्गज नेत्यांना व राजकारण्यांना देत ऊसतोड मजुरांना भाव वाढीसाठी तर ऊसतोड मजुरांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी सदैव लढा उभारला व तो लढा यशस्वी ही झाला. परंतु काळाचा घाला झाला आणि माझा गोपीनाथ आज रोजी आम्हा सर्वांना सोडून गेला ही भावना आज असा अठरा पगड जातीमध्ये ऐकायला मिळत आहे.

बीड जिल्ह्यामध्ये सर्वपक्षीय वेगवेगळ्या संघटना ऊसतोड मजूर असेल किंवा सर्वसामान्य कार्यकर्ता माणूस असेले यांनी स्वर्गी गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना आज तीन जून २०२४ रोजी तब्बल दहा वर्षांनी सुद्धा सर्व गोपीनाथ मुंडे यांचे विचार आपल्या आठवणी ठेवलेले आहेत. यांच्या विचाराला आठवणीला श्रद्धांजली देत असताना प्रत्येक ग्रामीण भागातील बीड जिल्ह्यातच नव्हे तर भारत देशातील अनेक नागरिक आज भावनिक होऊन स्वर्ग गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या आठवणींना उजाळा देत आहेत आजही सर्वांना वाटत आहे की माझा गोपीनाथ आज हवा होता...

जातीचा विष रोखण्यासाठी विजयी उमेदवार किंवा पराजय झालेले उमेदवार या सर्वांनी बीड जिल्ह्यात एक स्नेह मिलन लावून जातीचे विष रोखलं पाहिजे यासाठी पंकजा मुंडे धनंजय मुंडे प्रीतम ताई मुंडे बजरंग सोनवणे अशोक हिंगे यांनी पुढाकार घेऊन एक स्नेह मिलनाचा कार्यक्रम लावणे गरजेचे हीच खरी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांना श्रद्धांजली ठरेल असं मत बीड जिल्ह्यातील जनतेकडून ऐकायला मिळत आहे.

२०२४ लोकसभा जातीचे विष याच लोकसभेला सर्वात जास्त उगवलं या जातीच्या विषयाला पचविण्याचं धैर्य सामर्थ्य आणि सर्व जाती धर्मांना समाधानकार उत्तर देणे त्यांच्या सुखदुःखामध्ये जाणं हे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना नक्कीच कशा पद्धतीने जमत होतं हे फक्त गोपीनाथरावजी मुंडे साहेबच जाणू शकत होते. मुसलमान मराठा दलित ओबीसी या सर्वांना सोबत घेत स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी ग्रामपंचायत ते महाराष्ट्राच्या राजकारणात मंत्री आमदार केंद्राच्या राजकारणात खासदार ते मंत्री अशी पद अठरा पगड जातीमध्ये नवीन नवनव्या कार्यकर्त्यांना उभा करत त्यांनी जातीचा विष बाजूला करून नवीन कार्यकर्त्यांना संधी दिली आज माझा गोपीनाथ हवा होता ही भावना आज सर्व सामान्य जनतेमध्ये होत आहे. परंतु बीडच्या इतिहासामध्ये नोंद झाली आहे. २०२४ च्या निवडणुकीमध्ये मात्र सर्वात जास्त बीड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र भाजपचा बालेकिल्ला म्हणून जातीचा विष पेरण्यात आलं. परंतु या जातीचा विष पेरण्यामध्ये हेच राजकीय नेते आज जे आरोप प्रत्यारोप करून थंडावले आहेत. उद्या चार जून रोजी लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल आहे तो अठरापगड जातीच्या मतदाराने मत पेटीमध्ये बंद झालेला आहे वेगवेगळे एक्झिट पोल नुसार कोण येणार कोण नाही येणार हा प्रश्न पडलेला आहे. परंतु जनतेने दिलेला कौल विजयी व पराजय झालेल्या उमेदवाराला मान्य करावा लागेल. जो जिंकेल उमेदवार त्याने तरी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना श्रद्धांजली म्हणून एक शांतता किमतीची बैठक घेणे गरजेचे आहे आणि जो उमेदवार हरेल त्यानेही एक बैठक घेऊन हे जातीचे विष कुठेतरी थांबवलं पाहिजे. म्हणून या प्रश्नावरती कोण आवाज उठवेल स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचारावरती चालणाऱ्या पंकजाताई मुंडे प्रीतम ताई मुंडे.. धनंजय मुंडे बजरंग बप्पा सोनवणे अशोक हिंगे या सर्वांनी एक शांततेची बैठक घेऊन जातीचे विष पचविणाऱ्या गोपीनाथरावजी मुंडे साहेब या महान व्यक्तीला श्रद्धांजली म्हणून सर्व जाती धर्मांची एक स्नेह मिलन लावणे गरजेचे आहे. हीच स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना खरी श्रद्धांजली ठरेल..

३जून २०१४ बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर दुःखाचं डोंगर उभा करणारा दिवस स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब आज आपल्या बीड जिल्ह्यातीलच नव्हतं भारताच्या जनतेतून कायमस्वरूपी निघून गेले. दिल्ली येथे अपघात झाल्यानंतर स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांची निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली केंद्रीय मंत्रिमंडळ बीड ला येणारे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या बीड जिल्ह्यातील स्वागतासाठी अभूतपूर्व तयारी जिल्हा वाशियांकडून सर्वपक्षीय नेते व संघटना यांनी मोठ्या जोराने केली होती. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब हे आमच्या मनातील मुख्यमंत्री आणि देशाचे पंतप्रधान राष्ट्रपतीच अशी भावना बीड जिल्ह्यातील जनतेने होती. जे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी कमावलं होतं. ते आजच्या येणाऱ्या शंभर वर्षातील कोणत्याही राजकारणातील नेत्यांना कोणत्याही मुंडे घराण्यातील पिढीला कधीही जमणार नाही कारण स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यातील अठरापगड जातीला दलित मुस्लिम मराठा ओबीसी या सर्वांना सोबत घेऊन राजकारण केले कोणाच्या मनात जातीचा द्वेष आला तर स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जवळ गेल्याच्या नंतर त्या माणसाच्या मनात जातीचे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या दोन ऐकलेले शब्द हे त्या माणसाच्या डोक्यात शिरल्यानंतर तो माणूस जातीचे राजकारण बाजूला ठेवून स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या विचारावर विश्वास ठेवून बीड जिल्ह्याच्या राजकारणासाठी १८ पगड जातीला सोबत घेत सर्वसामान्यांना हम सब एक आहे चालणारा देणाऱ्या या बीड जिल्ह्यामध्ये स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा पुढील शंभर वर्ष असा नेता पुन्हा होणे शक्य नाही..

साहेब जावून दहा वर्षे झाली पण आजही वाटत नाही महाराष्ट्राच्या आजच्या काळवंडलेल्या राजकारणाला प्रकाश देणारा एक तेजस्वी सुर्याला विनम्र अभिवादन!

# युवा सामाजिक कार्यकर्ते,लेखक, व्याख्याते राजेश दिवटे यांची प्रेरणादायी मुलाखत

**१. आपल्या बालपणाविषयी थोडक्यात सांगा ?**

बीड । प्रतिनिधी

माझा जन्म ३जून १९९३ रोजी बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुकामध्ये खरात आडगाव या गावी शेतकरी कुटुंबात झाला. माझ्या आईचे नाव कांताबाई बाबासाहेब दिवटे माझे शाळेतील नाव दत्ता तर टोपण नाव राजेश माझी खरी ओळख ही टोपण नावानेच आहे आई लाडाने राजा म्हणायची आईचे ऐकून सारी गल्ली राजा म्हणायला लागली आणि पुढे या राजाचा मोठेपणी राजेश झाला परंतु आईला फक्त राजा पहायला भेटला राजेश तिला पहाता आला नाही कारण मी तिसरीच्या वर्गात असताना आई आजारपणाच्या निमित्ताने देवाघरी गेली.

माझे बालपण तसे संघर्षमय आहे लहान आसताना आई वडिलांना शेतकामात मदत करणे,लहानपणी मला पोहायचा खूप छंद होता आणि मी घरी कामाचे निमित्त सांगून अनेक वेळा मित्रांसोबत विहिरीवर पोहायला जायचो तसेच रानमेवा खायला खूप आवडायचा इ.

**२. आपले शिक्षण कुठे झाले ?**

माझे शिक्षण आश्रम शाळेत झाले पहिली दुसरी गावातील जिल्हा परिषद शाळेत तर ३ ते १२ माध्यमिक आश्रम शाळा वारोळा ता.माजलगाव जिल्हा बीड या ठिकाणी झाले. तर उच्च शिक्षण यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक येथे बी.ए केले तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे एम.ए केले.

**३.आपण सामाजिक क्षेत्रांत येण्याचे कारण काय ?**

खरतर हे जीवन जगत आसताना प्रत्येकांनी सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे या मताचा मी आहे.परंतु या क्षेत्रात मी आसा काय विचार करून आलो नाही लहानपणपासून जीवन जगण्यासाठी गरिबांना किती संघर्ष करावा लागतो तो मी अनुभवला आहे. मला शाळेत असताना शाळेची फी भरायला पैसे नसायचे, येवढेच नाहीतर कॉलेजला ॲडमिशन घेयला सुद्धा माझ्याकडे पैसे नव्हते मुक्त विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले.

परंतु आपण मोठे झाल्यावर आपल्या वाट्याला जो संघर्ष आला परंतु आपण आपल्या परीने समाजातील घटकांना जेवढी मदत करता येईल तेवढी केली पाहिजे खर तर मला अनाथ मुलांना आर्थिक तसेच शैक्षणिक मदत करायची या हेतूने १२ जानेवारी २०१८ राष्ट्रमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जन्मदिनानिमित्त यशवंती आधार सामाजिक संस्थेची स्थापना केली .

**४.आपल्याला या क्षेत्रात येताना करावा लागलेला संघर्ष ?**

संघर्ष कधीच पाठ सोडत नसतो मी संघर्षातूनच उभा राहिलो आहे . सुरवातीला अनेक आडची आल्या आजही येत आहेत




परुंतु आता थोडी माहिती मिळाली आहे आनुभव हा फार मोठा शिक्षक आहे.तो सर्व काही शिकवतो.

**५. आपण या क्षेत्रात एक केलेले कार्य ?**

आतापर्यंत तीनशेहून आधिक प्रेरणादायी व्याख्याने महाराष्ट्रातील अनेक शाळा महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष स्वखर्चाने जाऊन मोफत दिली आहेत.तसेच दोनशे विद्यार्थींना गणवेश वाटप केले आहेत शालेय साहित्य देखील दिले आहे.स्वच्छता मोहीम जनजागृती करणे, झाडे लावा झाडे जगवा असे उपक्रम संस्था दर वर्षी राबवते .

झुंज दिव्यांग संस्थेच्या वतीने आतापर्यंत ५५ दिव्यांग बांधवाचे मोफत घर संसारा सहित लग्न लावून दिले आहेत. १० हजार दिव्यांग बांधवाना व्यवसाय मार्गदर्शन दिले आहे. दोन हजार पेक्षा जास्त दिव्यांग बांधवाना लागणारे साहित्य वाटप केले आहेत.

**६. तुम्ही आतापर्यंत किती पुस्तके लिहिली आहेत ?**

मी आतापर्यंत यश तुमचेच , प्रगतीला पंख नवे,संघर्षाशी दोन हात, झिरो ते हिरो , नुकतेच शेतकऱ्यांचा सेवक हे पुस्तक प्रकाशित झाले आहे ह्या पाच प्रेरणादायी पुस्तकांचे लिखाण केले आहे.

कवितेसाठी जगलो तेव्हा हा कविता संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. तसेच हमाल ही कादंबरी लवकरच येणार आहे.

**७.आपल्याला या क्षेत्रात आलेला आनुभव ?**

खर तर आपण या क्षेत्राकडे कस पहातो हे फार महत्त्वाचे आहे आपल्याला समाजकार्यची आवड असेल तर कितीही लोकांनी त्रास दिला तरी काही वाटत नाही

कारण एकदा आपण स्वतःला झोकून दिले की मग मागे ओळून पहायचे नाही हे ठरवले आहे.आपल्या धावपळीमुळे घरच्या व्यक्तींना त्रास होतो जास्त वेळ देता येत नाही. आपण अनुभवातून शिक्षण घेतले पाहिजे मी या मताचा आहे.

**८.आपल्या कार्याचा इतरांना झालेला फायदा ?**

आज अनेक विद्यार्थी मार्गदर्शन घेत आहेत ते आपल्या ठरवलेल्या क्षेत्रात यशस्वी होत आहेत आतापर्यंत ५५ गरजू दिव्यांगांचे मोफत लग्न संस्थेच्या वतीने लावून दिले आहे.

हजारो युवकांना व्यवसाय मार्गदर्शन केले आहे अनेकांनी स्वतःचा उद्योग व्यवसाय उभा केला आहे. वृक्ष लागवड आणि स्वच्छता मोहीम राबवल्या आहे

९.आजच्या पिढीला आपल्या क्षेत्रातील कार्याबद्दल काय सांगाल ?

खरतर या क्षेत्रामध्ये आपल्याला खूप त्याग करावा लागतो,स्वतःचे मन मारून अनेक गोष्टी कराव्या लागतात .प्रत्येकाचे मन जपावे लागते अनेक नाहक त्रासाला सामोरे जावे लागते, सामाजिक कार्य करत असताना अनेक अडचणी येतात त्याला समोरो जावे लागते.एका वाक्यात सांगायचे झाले तर आपल्याला मनातूनच समाजाची सेवा करण्याची आवड असावी लागते.

**१०.आपले भविष्यात समाजाप्रती व्हिजन काय आहे ?**

मला येत्या २५ डिसेंबर २०२५ पर्यत अनाथ मुलाचे आश्रम बांधायचे आहे १०० मुलं दत्तक घेऊन त्यांचा सांभाळ करायचा आहे त्यांचा संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी घेयची आहे.

तसेच स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत ग्रंथालयाची व मार्गदर्शन केंद्राची उभारणी करणार आहे . तसेच व्यसनमुक्ती केंद्र उभे केले जाणार आहे

भविष्यात एक लाख विद्यार्थ्यांना मोफत प्रेरणादायी मार्गदर्शन करायचे आहे.

मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायची आहे.

**११.आपल्या संस्थेचे ऑफिस कुठे ?**

आमच्या यशवंती आधार सामाजिक संस्थेचे ऑफिस पुणे,आळंदी देवाची वडगाव रोड लगत राम मंदिरासमोर आहे आमचा व्हाट्सअप नंबर ८४८३८९८६४६ आहे .

# भोकनळ सरांच्या भेटीने चिंचोटीकर गेले भारवून

**वडवणी । प्रतिनिधी**

**चिंचोटी येथील जिल्हा परिषद शाळेवर मागील १५ वर्षांपूर्वी कार्यरत असणारे भोकनळ सर सपकाळ कुटुंबीयांच्या भेटीला अचानकपणे आल्याने चिंचोटी कर गेले भारावून सविस्तर वृत्त असे की मागील १५ वर्षांपूर्वी भोकनळ सर आणि त्यांच्या पत्नी जाधव मॅडम चिंचोटी येथे जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते त्यांच्या कार्यकाळामध्ये चिंचोटी येथे अनेक विद्यार्थी घडले .अनेक विद्यार्थी शासकीय नोकरीला लागले तर अनेक जन यशस्वीपणे आपला व्यवसाय करत आहेत .भोकनळ सर म्हणजे अत्यंत शिस्तप्रिय शिक्षक होते विद्यार्थी प्रिय होते म्हणून चिंचोटीकर आजही त्यांचं आदराने नाव घेतात नुसते विद्यार्थीच नव्हे तर पालकही भोकनळ सर चिंचोटी गावामध्ये आल्यानंतर त्यांना भेटण्यासाठी मोठ्या संख्येने जमले होते यावेळी अनेक जुन्या गोष्टींना उजाळा देण्यात आला जेव्हा जेव्हा शाळेमध्ये विविध कार्यक्रम होत असतात किंवा शैक्षणिक गुणवत्तेचा विषय निघत असतो तेव्हा गावकरी भोकनळ सर**

## विद्यार्थी घडवणारे असे शिक्षक चिंचोटीकरांना पुन्हा लाभलेच नाहीत



**सारखे आता शिक्षकच पाहिजेत अशी पालक वर्गात चर्चा असते**

चिंचोटी सारख्या ग्रामीण भागात भोकनळ सरांनी शैक्षणिक चळवळ गतिमान करण्याचं काम केलं आणि या चळवळीतूनच अनेक विद्यार्थी घडले त्यांच्या या कार्याबद्दल गावकरी सदैव ऋणी राहतील त्यांचा हस्ताक्षर सुधारण्यावर भर होता चींचोटीच्या विद्यार्थ्यासारखे वडवणी तालुक्यामध्ये कोणत्याही विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर नसायचे गणित मराठी, हिंदी ,इंग्रजी यासारख्या विषयात विद्यार्थी अत्यंत तरबेज झाले होते चिंचोटी चा विद्यार्थी म्हटलं की हुशार असणारच असा लौकिक त्यांनी गावाला मिळवून दिला होता

असे विद्यार्थी प्रिय शिक्षकबऱ्याच वर्षानंतर गावांमध्ये आल्यानंतर चिंचोटी करांना खूप आनंद झाला होता यावेळी गावातील सुमंत गोंडे शिवाजी गोंडे ग्रामपंचायत सदस्य केशव गोंडे उपसरपंच गोविंद गोंडे मारुती गोंडे अर्जुन गोंडे महेश उबाळे साहेबराव गोंडे समाधान गोबरे राजू दादा गोंडे बाप्पा कांबीकर नामदेव जावळे आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कृषीमंत्र्यांच्या जिल्ह्यात पवनचक्की कंपन्याकडून शेतकऱ्यांची आर्थिक लुट

## महसूल व पोलीस प्रशासन शेतकऱ्यांच्या मुळावर:- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

दि.०३ बीड जिल्ह्यातील सौर ऊर्जा आणि पवन उर्जा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक आणि आर्थिक लुबाडणूक होत असुन संबंधित प्रकरणात शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाला लेखी तक्रार करून न्याय मागितल्यावर महसूल व पोलिस प्रशासन सहकार्य करत नसुन याउलट कंपन्यांची आर्थिक हितसंबंध जोपासत पाठराखण करत असुन शेतकऱ्यांना दलाल आणि गुंडामार्फत दमदाटी व पोलीस प्रशासनामार्फत गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन मुस्कटदाबी करण्यात येत असून एकंदरीतच कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मुळावर पुढारी, महसूल व पोलीस प्रशासन उठल्याचे दिसत असुन संबंधित प्रकरणात चौकशी करून संबंधित कंपन्या व महसूल व पोलीस प्रशासनातील आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड



जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस च-हाटकर, रामनाथ खोड यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना केली आहे.

अपारंपारिक ऊर्जा निर्मितीला केंद्र सरकारचे प्रोत्साहन असुन यासाठी अगदी केंद्र स्तरावरून यंत्रणा कार्यान्वित होते.बीड जिल्ह्यात सध्या सौर ऊर्जा आणि पवनचक्की प्रकल्पांचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असुन शेतकऱ्यांच्या अज्ञानी पणाचा फायदा घेत चुकीची माहिती देऊन नियमांना तिलांजली देऊन कंपनीचे अधिकारी शेतकऱ्यांना जमिनीचे व्हॅल्युएशन कमी असल्याचे सांगत सदर जमीनीचे मुल्यांकन ठरवत अल्प दरामध्ये जमिनीची खरेदी व भाडे पट्टा व्यवहार महसूल प्रशासनातील अधिकारी यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांची फसवणूक आणि आर्थिक लुट करत असल्याचे दिसून येत आहे.

सौरऊर्जा आणि पवनचक्की कंपन्यांनी त्या त्या भागातील एजंट शोधून त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना गोड बोलुन मोठ्या प्रमाणात पैसा मिळेल, मुलांना नोकरी मिळेल अशा प्रकारची वेगवगळी आमिषे दाखवुन खोटी माहिती देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करतात.शेतक-याची ठराविक जागा ताब्यात घेऊन प्लांन्टचे काम सुरू झाल्यानंतर मात्र त्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात.

पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या नव्हे तर कंपन्यांच्या पाठीशी उभा रहात असुन फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी न्याय मिळवण्यासाठी शेतकरी कंपन्यांशी भांडु लागले तर शेतकऱ्यांना कायद्याचा धाक दाखवून तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील अशा धमक्या देऊन त्यांची मुस्कटदाबी करण्यात येत असुन यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक हितसंबंध जोपासत कंपन्यांची पाठराखण केल्याचे बोलले जाते.शेतकऱ्यांना विचारत न घेताच हस्तकांमार्फत कंपन्यांच्या गाड्यांसाठी रात्रीचे रस्ते तयार करण्यात येत असुन त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतरस्ता संदर्भात वादविवाद वाढले असुन संबंधित प्रकरणात पोलिस प्रशासन कंपन्यांची पाठराखण करताना दिसत आहे.

# लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर चकलांबा पोलिसांचे नागरिकांना आवाहन!

## वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप डमिनला जबाबदार धरून कारवाई करणार - एपीआय नारायण एकशिंगे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर बीड पोलिस दलाच्या वतीने अनोखी कार्यपद्धती अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची सोशल मीडियावरची देखरेख वाढवली आहे. व्हॉट्सअप ग्रुपवर आक्षेपार्ह पोस्ट आढळल्यास ग्रुप डमिनवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर बीड पोलिसांनी घेतलेल्या निर्णयाची सर्व स्तरांतून चर्चा सुरू आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १० मार्च ते दि.०६ जून पर्यंत आदर्श आचारसंहिता अंमलात असून बीड जिल्ह्यासह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल मंगळवार दि.०४ रोजी जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमांद्वारे कोणत्याही समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या भावना दुखवतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कमेंट, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार माध्यमाद्वारे करू नये तसे आढळून आल्यास ग्रुप डमिनला जबाबदार धरण्यात येईल, असे चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी म्हटले आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल उद्या दि.०४ जून रोजी जाहीर होणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमातून



कोणत्याही समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कमेंट, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमांद्वारे करू नयेत, तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये, डीजे वाजवू नये, फटाके फोडून ध्वनीप्रदूषण करू नये, तसेच विनापरवाना विजय मिरवणूक काढू नये, व्हाट्सअप ग्रुपचे डमिन यांनी दिनांक ०३ ते ०६ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये ओन्ली एडमिन असा बदल करून घ्यावा जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत. जर ॲडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्यांनी वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप डमिन ला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी असे आवाहन चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी व्हाट्सअप पोस्टद्वारे केले आहे.



**आज भारतीय जनता पार्टी संपर्क कार्यालय कोल्हेर रोड गेवराई येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार लक्ष्मण माधवराव पवार साहेब, यावेळी उपस्थित भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष प्रकाश (काका) सुरवसे, उपनगराध्यक्ष राजेंद्र (दादा) राक्षसभुवनकर,नगरपरिषदेचे सभापती भगवानराव जिजा घुंबार्डे, दादासाहेब गिरीमाझी गटशिक्षणाधिकारी जगन्नाथ (भाऊ) गरकळ, नगरसेवक राजेंद्र आर्दड, अशोकरावजी शिंदे,बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण (तात्या) चव्हाण, गेवराई मतदार संघाचे विस्तारक ईश्वरजी पवार, सतीश (दादा) दाभाडे, संतोष (दादा) वनवे, सुंदर (आबा) काकडे, अब्दुल भाई,रमेश राठोड, नारायण पवार,सचिन वावरे,हनुमान येवले, मगनराव परदेशी, छगन पवार, परमेश्वर राठोड, संतोष राठोड, श्रीराम घाटूळ, मतीन कुरेशी, व इतर पदाधिकारी उपस्थित होते**



**परळी - टोकवाडी येथील रहिवासी कु.स्नेहल विष्णू मुंडे इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९७ टक्के घेऊन यश संपादन केल्याबद्दल सोहम कोचिंग क्लासेस संचालक आंधळे सर सहशिक्षक कृष्णा तपके सर व आंधळे मॅडम अंभोरे मॅडम यांनी केला सत्कार स्विकारताना विद्यार्थिनीचे पालक विष्णू मुंडे सह कुटुंबातील सदस्य दिसत आहेत.**

## खरात आडगाव येथील डॉक्टरांना कार्यमुक्त करून. खरंच खरात आडगावकर जनतेस न्याय मिळेल का ?

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील खरात आडगाव येथील आरोग्य उपकेंद्रातील समुदाय अधिकारी डॉ. वैशाली घेवारे या सतत गैरहजर राहत असतात असा कांगावा करून तालुका आरोग्य अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पत्रकार असल्याचा आणि गावासाठी मी काहीतरी करतोय असे दाखवण्यासाठी एका महिला डॉक्टर यांना कार्यमुक्त करून वरिष्ठ अधिकाऱ्यांवर दबाव टाकून सरपंच व काही विघ्नसंतुष्टी माणसाला काय मिळाले असा सवाल खरात आडगाव येथील नागरिक उपस्थित करत आहेत याचे कारण म्हणजे पहिल्या डॉक्टर तरी सर्व खेडेपाडे करून आपल्या ठिकाणी प्रथम उपचार करण्यासाठी येत असे परंतु डॉक्टर गेल्यापासून अक्षरशः दवाखाना बंद असल्याचे चित्र पाहावयास मिळते जसा एवढा आटापिटा डॉक्टर यांना कार्यमुक्त करण्यासाठी केला तसाच आटापिटा गावच्या हितासाठी नागरिकाच्या आरोग्यासाठी हे सरपंच व पत्रकारितेचा आव आनारे का करत नाहीत असा सवाल खरात आडगाव येथील जनता वृत्तपत्राच्या माध्यमातून विचारत आहे मग सवाल असा उपस्थित होतो की डॉक्टर यांना कार्यमुक्त करून सरपंच महोदयाने काय साध्य केले याचे उत्तर सुद्धा सरपंच महोदयांनी नागरिकांना देणे गरजेचे आहे उपचार करण्यासाठी माजलगाव या ठिकाणी जावे लागत आहे हे तेवढेच खरे आहे

# शिरसदेवी येथे जादा दराने बियाणे विकणाऱ्या कृषी केंद्र चालकास पकडले

## सार्थक ग्रो अँड ट्रेडर्स असे कारवाई केलेल्या कृषी केंद्राचे नाव आहे!

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सापळा रचून गेवराई तालुक्यातील शिरसदेवी येथील एका कृषी केंद्र चालकास रंगेहाथ पकडले. ही कारवाई १ जून रोजी करण्यात आली. या दुकानात आढळून आलेल्या कापूस बियाणांचा स्त्रोत आढळून आला नसल्याने २१ लाखांचे बियाणे विक्री बंदचा आदेशही त्या दुकान चालकास बजावला आहे.**

सार्थक ग्रो अँड ट्रेडर्स असे कारवाई करण्यात आलेल्या कृषी केंद्राचे नाव आहे. खरीप हंगाम सुरू होत असल्याने बाजारात शेतकरी बियाणे व खते घेण्यासाठी गर्दी करत आहेत. याचा फायदा उचलत काही कृषी केंद्र चालक शेतकऱ्यांना जादा दराने बियाणे विक्री करत असल्याचे समोर आले. दरम्यान, कृषी विभागाच्या वतीने सापळा रचण्यात आला. गेवराईचे तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते यांना एका दुकानामध्ये जादा दराने बियाणांची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पंचनामा करून बनावट ग्राहक तयार केला. त्याच्याकडे १७५० रुपयांच्या विविध चलनी नोटा देऊन अधिक दराने बियाणे विक्री होत आहे का याची पडताळणी करण्यासाठी शिरसदेवी येथील सार्थक ग्रो अँड ट्रेडर्स येथे त्या बनावट ग्राहकास पाठविण्यात आले.

त्यावेळी दुकानदार रमेश प्रभाकर डरपे यांनी त्या बनावट ग्राहकास ८६४ रुपयांची



कबड्डी कापूस बियाणांची बॅग १३०० रुपयांना विक्री केली परंतु पावती मात्र ८६४ रुपयांची दिली. त्यानंतर तातडीने तालुका कृषी अधिकारी व पथकाने पंचासमक्ष चिन्हांकित केलेल्या नोटांची पडताळणी केली. या कारवाईनंतर परिसरातील इतर शेतकऱ्यांनीही तक्रारी केल्या. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत दुकानाची तपासणी केली असता दुकानदाराकडे खरेदी बिल तसेच बियाणांचा स्त्रोत आढळून आला नाही. त्यामुळे अंदाजे २१ लाख रुपये किमतीचे बियाणे विक्री बंदचा आदेश गेवराईचे तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते यांनी दिला. या कारवाईत कृषी सहायक भगवान मोहळकर यांचे सहकार्य लाभले. संबंधितांच्या परवान्यावर जिल्हा गुणवंत निरीक्षक कल्याण अंभोरे यांच्या वतीने कारवाई प्रस्तावित होणार आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी दीपा मुधोळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.


कृषी केंद्र चालकांनी कोणत्याही बियाणांची चढ्या भावाने विक्री करू नये. तसेच स्वत: जवळ बियाणे उपलब्धतेचा स्रोत सोबत ठेवावा. विक्रेत्यांनी अधिकृत परवानाधारक नसलेल्या किरकोळ विक्रेत्या व्यक्तीस बियाणे विक्री करू नये. चढ्या दराने बियाणे विक्री होत असल्यास कृषी विभागाकडे तक्रार करावी

–बाबासाहेब जेजुरकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड

# सिरसदेवी परिसरात छोट्या टिप्परने खुलेआम अवैध वाळूची वाहतूक सुरु

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी परिसरात खुल्लमखूल्ला वाळू वाहतूक छोट्या टिप्परणे सुरु असून यावर नियंत्रण ठेवणारी शासकीय यत्रनां कोलमडली असून याचाच फायदा घेत परिसरात वाळू माफिया डोके वर काढून खुलेआम छोटया टिप्पर ने व १४ टायर असलेल्या ट्रकणे खुलेआम वाळूची वाहतूक करत असून याकडे स्थानिक तलाठी, मंडळाधिकारी यांचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.या वाळू माफियाला कोणाचीच भीती नसल्याने ते खुलेआम तलवाडा रोडने सिरसदेवी गावातून ७ ते ८ च्या दरम्यान अवैध वाळूची गाडी आणून पोलीस प्रशासनाला व महसूल विभागाला खुलेआम चॅलेंज देत असल्याचे दिसत आहे.



तलवाडा परिसरातून वाळू भरून येणारी वाहने सुसाट वेगात सिरसदेवी गाव व परिसरातून जात आहेत दिवसा ढवळ्या उघडी वाळू नेण्यात येत असल्याने दुचाकीश्वरांना अपघातामध्ये लोटण्याचा प्रयत्न देखील या वाळू माफियाकडून होत असल्याची चर्चा गावात होऊ लागली आहे.तसेच सिरसदेवी पासून जवळच असलेल्या सुलतानपूर या गावा जवळ मोठया प्रमाणात वाळूचा स्टॉक करण्यात आला असून हा स्टॉक कोणाचा आहे याची खात्री करणेचे गरजेचे तसेच स्थानिक तलाठी व मंडळ अधिकारी यांना हा स्टॉक का दिसत नाही अशीही चर्चा परिसरात आहे तसेच स्टॉक दिसल असेल तर कारवाई का करत नाहीत असेही बोलले जात आहे. तलाठी ऑफिस समोरून हे छोटे टिप्पर जात असताना यांना का दिसत नाहीत असाही प्रश्न उपस्थित होत आहे.दररोज या वाळू माफियाची छोटा टिप्पर सह १४ टायर ट्रक मधून अवैध वाळू वाहतूक करताना दिसून येत असून महसूलचे स्थानिक अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असून या वाळू माफियाला अभय देण्याचा प्रयत्न करत असल्याचे बोलले जात आहे.

तसेच याच वाळू चोराची छोटा टिप्पर चालणारी गाडी ही कुठल्याही पथकाने अवैध रित्या वाळू करताना गाडी पकडली तर आर्थिक तडजोड करून ही गाडी सोडून घेत असल्याची चर्चा नागरिकांत आहे. त्यामुळे या वाळू चोराचे मनोबल वाढले असून तो कोणालाही घाबरत नाही तसेच त्याच्या विरोधात कोणाला कारवाई करायची तर करा माझं कोणी वाकडं करत नाही अशी भाषा तो प्रत्येकाला बोलत असल्याची चर्चा नागरिकांत आहे.यावरून एकच बाब लक्षात येते कि सदरील वाळू चोराकडे स्थानिक तालुका महसूलचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. यामुळे राज्य शासनाच्या खनिजावर वाळू माफियाकडून दिवसा ढवळ्या दरोडा टाकल्या जात आहे.




पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती महावितरण सार्वजनिक जयंती उत्सव समिती तर्फे साजरी करण्यात आली.कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत महीला कर्मचाऱ्यांच्या हस्ते करून महिलांना विशेष मान देण्यात आला.स्वराज्य संकलपक राजमाता जिजाऊ,राजमाता अहिल्या देवी, माता सावित्री, माता रमाई, यांचा वारसा आजच्या युगात पुढे चालवत महावितरण मधील सर्वच महिला पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक विभागात उत्कृष्ठ कार्य करतात.त्यांपैकी काही महिला रणरागिणीना वर्ग १ते वर्ग ४ प्रत्येक विभाग/उपविभाचे प्रतिनिधित्व स्वरूपात श्रीमती–रोहिणी कुलकर्णी मॅडम,सविता पवार मॅडम,अनुराधा सातपुते मॅडम, आरती मून मॅडम,निशा नाडे मॅडम,उषा जगदाळे मॅडम,अर्चना लोंढे मॅडम,रितिका कसबे मॅडम,भाग्यश्री शिंदे मॅडम या महिलांना सन्मान चिन्ह देऊन 'अहिल्यादेवी होळकर नारी शक्ती सन्मान पुरस्कार ' देऊन गौरविण्यात आले. कार्यरत सर्व महिला कर्मचाऱ्यांना जयंती निमित्त फेटे घालून महिलांना कार्यक्रमात प्रमुख स्थान देण्यात आले.जयंती निमित्त कर्मचारी पाल्य तनुजा लिमकर, स्वराली भोंडवे,सुजल भोंडवे,प्रज्वल प्रभाळे,विराज जाधव, आर्या ठोकरे,साक्षी जाधव या बाल वक्त्यांनी भाषण केल्याबद्दल व दिव्या साळुंके व अक्षरा साळुंके या दोन मुलींनी कार्यक्रम स्थळी अहिल्या मातेच्या प्रतिमेची हुबेहूब तेजस्वी सुंदर अशी रांगोळी चित्र काढल्याबद्दल प्रोत्साहन पर सन्मान चिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.कार्यक्रमास उपस्थित प्रमुख व्याख्याते श्री कचरू चंश्रभारे सर व राहुल गिरी सर यांनी अहिल्या देवी होळकर यांनी केवळ विशिष्ठ समाजासाठी किंवा धर्मासाठी कार्य केले नाही तर सर्व समाजासाठी कार्य केले व अनिष्ट चालीरीती परंपरा ना गाडण्याचे महान कार्य केले. त्यांच्या प्रशासकीय कामकाज व त्यांचा विशाल इतिहास सर्व कर्मचाऱ्यां समोर मांडून आदर्श कार्यपद्धती कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केले.व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री घुमे साहेब,कांबळे साहेब,पाटील साहेब,श्रीमती कुलकर्णी मॅडम,रोडे सर,प्रमुख वक्ते कचरू चंश्रभारे सर व राहुल गिरी सर होते. तसेच कार्यक्रमास सर्व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैसे दिल्याशिवाय काम होईना लाचखोरी चव्हाट्यावर!

प्रतिनिधी । टाकरवण

लहानपणीच आई–वडिलांचं छत्र हरवलेल्या अनाथ मुलांच्या संगोपनासाठी शासनाकडून आर्थिक मदत दिले जाते. बाल संगोपन योजनेचा लाभ घेण्यासाठी महिला व बाल विकास कार्यालय माजलगाव मधील अधिकारी लाच मागत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सहा महिन्यापासून अर्ज करून ही अनाथ मुलांना न्याय मिळत नाही. या प्रकाराबाबत येथील कामचुकार अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांच्याकडे कपिल आडागळे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिल महिला बालविकास योजनेअंतर्गत अनाथ मुलांना बाल संगोपनासाठी आर्थिक मदत दिली जाते. ही योजना २००८ मध्ये लागू करण्यात आलेले आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी महिला व बाल विकास कार्यालय माजलगाव अर्ज करण्यास गेलेल्या नागरिकांना तेथील अधिकारी पैशाची मागणी करत आहेत. पैसे दिले तरच योजनेचा लाभ मिळेल अथवा लाभ मिळणार नाही.अशी भाषा अधिकाऱ्याकडून ऐवजी लाच मागितली जात वापरली जाते. जे नागरिक या योजनेसाठी तेथील अधिकाऱ्याला पैसे देतात. त्यांनाच या योजनेत सामील करून लाभ दिला जातो. जे नागरिक अधिकाऱ्यांना पैसे देण्यास नकार देतात त्यांचे प्रस्ताव सहा सहा महिने महिला व बाल विकास कार्यालयामध्ये धुळखात पडलेले आहेत. तालुक्यातील अनाथ मुलावर अन्याय होत



आहे. या योजनेतून अनाथ मुलांना लाभ मिळण्या असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माजलगाव महिला व बाल विकास कार्यालय मधील लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते कपिल आडागळे यांनी. महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे, मोरे यांच्याकडे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

आदरणीय सर लोकांना सांगतात की माझं काहीतरी गैरसमज झालेला आहे परंतु माझा काहीही गैरसमज झालेला नाही माझ्याकडे तर पैशाची मागणी केलीच आहे परंतु आणखी काही लाभार्थ्या कडु पैसे घेतलेले आहेत असे लाभार्थी कार्यालयात आले असताना मी विचारपूस केली आहे ज्या लाभार्थ्याकडून पैसे घेतलेले आहेत त्या लाभार्थ्यांनी स्पष्ट व्हिडिओच्या माध्यमातून सांगितलेले आहे की माझ्याकडून पैसे घेतलेले आहेत संरक्षण अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व लाभार्थ्यांची चौकशी करण्यात यावी.त्यांच्या अंतर्गत येणारी सर्व गावे सर्व तालुक्यात मधील ज्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे त्यांच्याकडून किती पैसे घेतलेले आहेत याची निष्पक्षपातीपणे चौकशी करण्यात यावी

प्रतिक्रिया: कपिल आडागळे

## लोकसभा निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे.फेसबुक,इंस्टाग्राम,व्हाट्सअप ग्रुप व इतर एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही अफवा पसरवू नका

## देविदास वाघमोडे सहय्यक पोलीस निरीक्षक,पोलीस ठाणे धारुर

**धारुर । प्रतिनिधी**

**पोलीस ठाणे धारुर बीड तर्फे जाहीर आवाहन पोलीस ठाणे धारुर हद्दीतील सुजाण नागरिकांना याद्वारे पोलीस ठाणे धारुरच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात येते की, बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १६/०३/२०२४ पासून ते दिनांक ०६/०६/२०२४ रोजी पावेतो आदर्श आचारसंहिता अंमलात असून बीड सह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल दिनांक ०४/०६/२०२४ रोजी जाहीर होणार असून त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की , कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक,इंस्टाग्राम,व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या**

जातीच्या धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट कॉमेंट्स स्टोरी स्टेटस डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत. तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये, डीजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाहीत, तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये. व्हाट्सअप ग्रुपचे एडमिन यांनी दिनांक ०३/०६/२०२४ ते दिनांक ०६/०६/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये जछडध –ऊ्रचखछ करून बदल करून घ्यावा जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत जर ॲडमिन यांनी सेटिंग मध्ये



बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप एडमिन ला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

श्री. देविदास वाघमोडे सहय्यक पोलीस निरीक्षक,पोलीस ठाणे धारुर बीड

# एक्झिट पोलची पोलखोल

प्रशांत बाफना
८०५५४४०३८५

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातील मतदानाची सांगता होताच विविध वृत्तवाहिन्या व एजन्सीने आपले निवडणूक अंदाज म्हणजेच 'एक्झिट पोल' जाहीर केले आहेत. या निवडणूकपूर्व चाचण्यांमध्ये सर्वांनी भाजपला जवळपास विजयी घोषित केले. त्यामुळे भाजपच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, ते तंतोतंत खरे ठरतात असे अद्याप घडलेले नाही. एक्झिट पोलची सुरुवात अमेरिकेत १९३६ मध्ये झाली. त्यावेळी जॉर्ज गॅलप आणि क्लॉड रॉबिन्सन या जोडीने न्यूयॉर्कमध्ये निवडणूक सर्वेक्षण केले. मतदानाच्या दिवशी त्यांनी मतदारांना अध्यक्षपदासाठी कोणत्या उमेदवाराला मतदान केले, हे जाणून घेतले. त्यांच्या या पोलमध्ये फ्रँकलिन डी. रुझवेल्ट विजयी होतील, असा अंदाज वर्तवला होता आणि तो खरा ठरला. यानंतर एक्झिट पोलचा ट्रेंड जगभरात गाजला. यानंतर १९३७ मध्ये ब्रिटनमध्ये, १९३८ मध्ये फ्रान्समध्ये पहिला एक्झिट पोल घेण्यात आला. भारतात १९५७ मध्ये दुसऱ्यांदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यावेळी पहिल्यांदा एक्झिट पोल घेण्यात आला होता. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ओपिनियनने हा एक्झिट पोल घेतला होता. पण त्यावेळी ते एक्झिट पोल म्हणून पूर्णपणे ग्राह्य धरले नाहीत. यानंतर १९८० मध्ये डॉ. प्रणय रॉय यांनी पहिल्यांदा पूर्णपणे एक्झिट पोल घेतला होता. त्यावेळी 'दूरदर्शन'वर एक्झिट पोलचे प्रक्षेपणही केले होते. एक्झिट पोलचे अंदाज टीव्हीवर दाखवण्याची ती पहिली वेळ होती. सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज या संस्थेने हा एक्झिट पोल घेतला होता. मात्र, अमेरिकन व भारतीय लोकशाही यात फरक आहे. भारतीय लोकशाहीत अमेरिकेप्रमाणे द्विपक्षीय शासनपद्धती नाही. येथे प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवर पक्ष आहेत. त्यामुळे या पोलमधून केवळ निवडून येणाऱ्या पक्षाचा विचार केला जातो. एखादा पक्ष किती जागांवर निवडून येऊ शकतो, याचे अंदाज वर्तवले जातात. मात्र, निवडणुकीत सहभागी प्रत्येक उमेदवाराचे विश्लेषण केले जात नाही. एक्झिट पोलमध्ये एखाद्या पक्षाला किती टक्के मतदान होईल, याची आकडेवारी काढली जाते. मतदान झाल्यानंतर लागलीच हे पोल प्रसिद्ध केले जातात. एक्झिट पोलमुळे आपल्याला कोण जिंकणार, याचा अंदाज येतो, पण कोणत्या पक्षाच्या किती जागा येतील, हे नेमकेपणे समजू शकत नाही. याला कारण म्हणजे भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी आहे. लोकसंख्या व भौगोलिक परिस्थिती पाहता प्रत्येक मतदारापर्यंत एक्झिट पोल घेणाऱ्या एजन्सी, वृत्तवाहिनीला पोहोचता येत नाही. एक्झिट पोल हे निवडणूक सर्वेक्षण आहे. मतदानाच्या दिवशी वृत्तवाहिन्या व एक्झिट पोल एजन्सीचे प्रतिनिधी मतदान केंद्रांवर मतदारांना निवडणुकीशी संबंधित काही प्रश्न विचारतात व त्यांच्या प्रतिसादाच्या आधारे मतदारांचा कल कुठे आहे, याचे मूल्यांकन करतात. आता तर कोणत्या उमेदवाराने किती पैसे वाटले यावरूनही त्याचा विजयाचा आकडा ठरवला जातो. मात्र, ज्याप्रमाणे एक्झिट पोल घेणारी एजन्सी प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचू शकत नाही त्याचप्रमाणे पैसे वाटप करणारे प्रत्येक मतदाराला पैसे देऊ शकत नाहीत. पैसे वाटपावरून कोणत्या उमेदवाराचा निश्चित विजय होईल, हे सांगणे ही गावठी पद्धत झाली. एखाद्या पक्षाच्या नेमक्या जागा किती येतील, हे एक्झिट पोल करणाऱ्यांच्या सॅम्पलिंगवर अवलंबून असते. एखादा पोल व्यवस्थित करूनही त्याच्यात जागा किती मिळतील, याबाबत अनिश्चितता असू शकते. अध्यक्षीय पद्धतीत अध्यक्ष कोण निवडून येईल, हेच फक्त सांगायचे असते. मात्र, आपल्याकडे ५४३ मतदारसंघ आहेत. अशावेळी प्रत्येकाचा ठोकताळा जमा करून तो तंतोतंत सांगणे अवघड असते. त्यामुळे आपल्याकडे एक्झिट पोलचे अंदाज चुकताना दिसतात. अनेक पक्ष असल्याने मतदारही विचार करूनच आपली प्रतिक्रिया देतात. त्यातच आता ऑनलाइन सर्वेक्षण केले जाते. या सर्वेक्षणातून संबंधित मतदारसंघातील संभाव्य विजयी उमेदवाराच्या नावापुढे टिकमार्क करणे अथवा ऑनलाइन व्होटिंग करणे, हे पर्याय दिले जातात. पण यात सहभागी मतदारांची ओळख पटवणे अवघड असते. त्यामुळे अनेक वेळा ऑनलाइन सर्वेक्षण बोगस ठरल्याचे दिसले आहे. भाजपने यावेळी मतदानपूर्व सर्वेक्षण करून विजयाची खात्री असणाऱ्या उमेदवारांनाच उमेदवारी दिली. याचा सर्वांत जास्त फटका शिवसेना शिंदे गटाच्या इच्छुकांना बसला. भाजपच्या या सर्वेक्षणामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर केलेल्या उमेदवारांची उमेदवारी मागे घ्यावी लागली. आता त्यांचा निवडणूकपूर्व अंदाज कितपत खरा ठरतो, हे लवकरच समजेल. त्याचप्रमाणे एक्झिट पोलमधून भाजपच्या विजयाचा दावा करणाऱ्या एजन्सी, वृत्तवाहिन्यांचे ठोकताळे कितपत योग्य होते, हेही निष्पन्न होईल. एक्झिट पोल हा एक ठोकताळा असतो. यामुळे संबंधितांनी हुरळून जाण्याचे कारण नाही. राज्यातील स्थिती पाहता अनेक उमेदवारांनी आपल्या विजयाचा दावा केला असून, त्या अनुषंगाने बॅनरही तयार ठेवले आहेत. काहींना विजयाची पूर्ण खात्री असल्याने त्यांनी आपले बॅनर विविध शहरांतून झळकावले आहेत. मात्र, लोकशाहीत मतदार हा राजा असतो. त्याच्या मनात एक आणि ओठावर एक असते. ऐनवेळी सत्तापरिवर्तन घडवून आणण्याची ताकद त्याच्या बोटात असते याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. दोन दिवसांत एक्झिट पोलवाल्यांची पोलखोल होते की मतदार हाच राजा ठरतो, हे निष्पन्न होईल.



# स्व. गंगाबिषण बियाणी आणि स्व. भगीरथ दादा बियाणी यांच्या प्रेरणेतून नातू 'भाग्येश'चा नावीन्यपूर्ण वाढदिवस साजरा

पसायदान उपक्रमातील अनाथ मुलांनी लुटला पाणीपुरी आणि इतर चाऊ माऊचा आनंद

बीड । प्रतिनिधी

येथील बियाणी परिवाराने आपल्या समाजसेवेचा वारसा कायम ठेवत आणि स्व. गांगाबिषण बियाणी आणि स्व. भगीरथ दादा बियाणी यांच्या प्रेरणेतून आज बियाणी परिवाराच्या भावी पिढीचा लाडका भाग्येश प्रविण बियाणी याचा वाढदिवस बीड जिल्ह्यातील पसायदान उपक्रमातील अनाथ मुलांच्या सोबत साजरा करण्यात आला.

यावेळी लहान मोठ्यांचा सर्वात आवडीचा खाद्य पदार्थ म्हणजे पाणीपुरी. आज वाढदिवसाचे औचित्य साधुन सर्व मुलांना पाणीपुरी, चिप्स, बिस्कीट, कॅडबरी इत्यादी चाऊ माऊचा आस्वाद लुटण्याची संधी बियाणी परिवार मार्फत मिळाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पसायदान प्रकल्पातील सर्व मुलांना आणि मुलींना पाणीपुरी खाताना चौपाटीवर पाणीपुरी खात आहेत असे फील झाले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. यावेळी प्रकल्पातील विद्यार्थिनींनी आणि दराडे ताईंनी भाग्येश चे औक्षण केले. विद्यार्थ्यांनी गीत सादर करून वाढदिवस साजरा केला. यावेळी कैलास बियाणी, डॉ. पवन, डॉ. श्रुती, ड. श्रेया बियाणी, डॉ. कोमल जाजू, इंजि. दिव्यन जाजू , ड. काजल जाजू, इंजि. प्रविण बियाणी, भागवत खाकरे, शंकर मामा, पाणीपुरी वाले मामा इत्यादी लोकांची उपस्थिती होती. मनोगत व्यक्त करताना कैलास बियाणी म्हणाले की नेहमीप्रमाणे बियाणी परिवाराच्या उपक्रमातून नक्की समाजातील लोकांना एक आदर्श वाढदिवस कसा साजरा करावा याची प्रेरणा मिळेल. आजकाल नाही त्या गोष्टींवर खर्च करण्यापेक्षा असा सत्कारणी वाढदिवस साजरा करण्यावर लोकांनी भर द्यावा असे प्रतिपादन प्रविण बियाणी यांनी केले.

# मतमोजणीची प्रक्रिया वस्तुनिष्ठपणे पार पाडावी : मतमोजणी निरीक्षक

बीड : मतमोजणीची प्रक्रिया वस्तुनिष्ठपणे पार पाडावी यासाठी योग्य ते प्रशिक्षण अधिनस्त कर्मचाऱ्यांना देण्याचे आवाहन मतमोजणी निवडणूक निरीक्षक बसवराज आर. सोमन्ना यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज मतमोजणी निवडणूक निरीक्षक बसवराज आर सोमन्ना जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण देण्यात आले त्यावेळी श्री आर सोमन्ना बोलत होते.

जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी मतमोजणी निरीक्षक श्री आर. सोमन्ना यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा आचारसंहिता कक्ष प्रमुख वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, पोस्टल बॅलेटचे सहाय्यक निवडणूक अधिकारी शैलेश सूर्यवंशी, गेवराई विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक अधिकारी ओमकार देशमुख मंचावर उपस्थित होते.माजलगाव, परळी, बीड, केज मतदार संघातील सहाय्यक निवडणूक अधिकारी अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रशिक्षण घेणारे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

श्री आर. सोमन्ना, म्हणाले मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असून येत्या ४ जूनला मतमोजणी होणार आहे या मतमोजणीचे प्रशिक्षण यापूर्वी देण्यात आले असून प्रत्येक नेमलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी मतमोजणीची प्रक्रिया पार पाडताना अतिशय लक्षपूर्वक ती करावी. मतमोजणीच्या प्रक्रियेतील प्रत्येक फेरी मध्ये उमेदवारांकडून नेमण्यात आलेल्या प्रतिनिधींचे समाधान होईपर्यंत पुढे जाऊ नये. लिहिण्यात येणारी मतमोजणीची संख्या ही सुपरवायझर, सहाय्यक तसेच सूक्ष्म निरीक्षक आणि उमेदवार यांच्या प्रतिनिधींनी बघितल्यानंतरच लिहावी.

सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी त्यांच्या विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राच्या फेरीची मतमोजणी झाल्यानंतर संगणकाद्वारे देण्यात येणारी माहिती ही परिपूर्ण योग्य असल्याची खात्री करूनच ती स्वतः लिहून जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सादर करावी.बीड मतदारसंघात ४१ उमेदवार आणि एक नोटा असे ४२ ची यादी असल्याने मतमोजणीला थोडा वेळ लागणार आहे. परंतु तरी देखील ही मतमोजणी लक्षपूर्वक आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने पार पाडणे हे प्रत्येक नेमलेल्या अधिकाऱ्यांचे कर्तव्य असून त्यांनी त्याची कर्तव्याची जाणीव ठेवून ही प्रक्रिया पार पाडावी.

मतमोजणीच्या प्रक्रियेत नेमलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बाहेर जाता येणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने तसे नियोजन ठेवून काम करणे आहे. यासह मतमोजणी दरम्यान कोणाकडे मोबाईल राहणार नाही.मतमोजणी दरम्यान निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेले तक्ते हे नीट सुवाच्च इंग्रजी अक्षरात लिहिणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.



निवडणूक आयोगाकडून नेमण्यात आलेले मतमोजणी निरीक्षक हे प्रत्येक फेरीतील कुठल्याही दोन कंट्रोल युनिटची तपासणी सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून करतील. मतमोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केलेली तपासणी आणि मतमोजणी निरीक्षकाकडून झालेल्या तपासणीमध्ये एक वाक्यता असायला हवी. यात तफावत आढळल्यास ताबडतोब सदर कर्मचारी बदलून घेतला जाईल व त्या कर्मचाऱ्यांवर निवडणूक आयोगाने दिलेल्या कलमानुसार कारवाई करण्यात येईल.यासह एकूण मतमोजणी झाल्यानंतर प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील किमान पाच व्हीव्हीपॅट मशीनची मतमोजणी केली जाईल. ही मतमोजणी कशी असावी याबाबत आज प्रशिक्षण देण्यात आले. व्हीव्हीपॅट मशीन मधून सर्व चिठ्ठया काढून ही चिठ्ठी ज्या उमेदवाराच्या अनुक्रमांकाची असेल त्या पिजन बॉक्स मध्ये उमेदवारांचे प्रतिनिधी यांना समक्ष दाखवून जोराने बोलून ठेवावी. यात आधी पिजन बॉक्समध्ये मार्क केलेले नंबर नीट पहावे आणि त्याप्रमाणे त्या त्या बॉक्समध्ये पडलेल्या मतदानाची स्लिप टाकावी. शेवटी त्याची मोजणी करावी या प्रक्रियेमध्ये गल्लत करता कामा नये अगदी शांतपणे ही प्रक्रिया पार पाडावी. ही सर्व प्रक्रिया व्हिडिओ ग्राफीमध्ये रेकॉर्ड होणार असून ती निवडणूक आयोगाकडे सादर केली जाईल.

मतमोजणीची प्रक्रिया पार पडत असताना विधानसभा निहाय नेमलेल्या सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांनी ती वस्तुनिष्ठ पद्धतीने नेमकी होत आहे का याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. तसेच एकूण मतमोजणीची संख्या स्वतः लिहावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी यावेळी दिले. व्हीव्हीपॅट मधील पर्चीची मोजणी कशी करावी याबाबतचे प्रशिक्षण केज चे सहाय्यक निवडणूक अधिकारी दीपक वजाळे यांनी दिले.

नाथापूर रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन येथे मतमोजणीची प्रक्रिया पार पाडली जाणार असून या ठिकाणी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था आहे. मतमोजणी अधिकारी कर्मचाऱ्यांना कोणत्याही कारणावरून या इमारतीच्या बाहेर जाता येणार नाही त्यांना लागणाऱ्या खाण्यापिण्याचे पदार्थ हे जिल्हा प्रशासनाच्या वतीने पुरवण्यात आले असून या ठिकाणी आरोग्य विषयी समस्या उद्भवल्यास त्यासाठी आरोग्य विभागाने ही योग्य ते नियोजन केले आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केल्यानंतर मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याचे सांगण्यात येईल.

# शिवराज्याभिषेक सोहळा भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन ६ जून 'लोकोत्सव'

## 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' ठरणार मुख्य आकर्षण

बीड (प्रतिनिधी)

कोल्हापूर : 'राज्याभिषेक' शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचे सुवर्णपान, यवनी सत्तांच्या अत्याचारातून महाराष्ट्रभूमीला स्वातंत्र्याचा हंकार देणार हा क्षण. शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार आले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला, मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला अन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदा या ऐतिहासिक घटनेस ३५० वर्षे पूर्ण होत आहेत.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२४ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार



ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार व्हा ... गंगाधर काळकुटे, पूजा मोरे, ऋषिकेश बेदरे,गोपाळ धाड़े यांची पत्रकार परिषदेत माहिती

शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. यंदा 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' कार्यक्रम शिवराज्याभिषेक महोत्सवाचे आकर्षण बिंदू असणार आहेत. देशभरातील लाखो शिवभक्तांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

यंदा गडावर पाच जूनला सायंकाळी पाच वाजता 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची' हा शिवकालीन युद्धकला प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम होणार आहे. महाराष्ट्रातील युद्धकला आखाड्यांचा यात सहभाग असणार आहे. महाराष्ट्राची पारंपरिक युद्धकला कशी असते, याचे दर्शन गडावर येणाऱ्या तमाम देशवासियांना व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. पट्टा, तलवार, भाला, विटा, जंबिया, कट्यार, माहू, फरी गदका यांच्या विविध प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. सायंकाळी सात वाजता राज दरबार येथे 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' हा शाहीरी कार्यक्रम होणार आहे, या कार्यक्रमात महाराष्ट्रातील शाहीर सहभाग घेणार आहेत.

# माजलगाव ग्रामीण भागात अवैध दारु विक्री कोणाच्या छत्र छायेत धडाक्यात सुरु

## १५ ते १६ वयोगटातील तरुण पासून ते वय वर्धा प्रयन्त या व्यसनाचे बळी

माजलगाव (प्रतिनिधी)

सरकारला विसर पडला आहे. बकाल झालेल्या खेडेगावांतही दारू सहज उपलब्ध होते. यासाठी गावांत मान्यताप्राप्त दुकाने असलीच पाहिजेत, असे अजिबात नाही. मराठवाड्याच्या शहर व ग्रामीण भागात अवैध दारूविक्री धडाक्यात सुरु आहे. काही गावांतील अख्खी तरुण पिढी या व्यसनाच्या आहारी गेली आहे. १५ ते १६ वयोगटातील तरुण देखील या व्यसनाच्या आहारी गेली आहे. घरी एक वेळ जेवण नसले तरी चालेल पण सकाळी चहा च्या आधी दारू पिण्यासाठी लागते अश्या प्रकारे खुपजास्त प्रमाणात दारूची वेसण लागले आहे, या दारूमुळे कित्येक गावातील अखखेच्या अख्खे कुटुंब बरबाद झाले आहे. दारू विक्री करण्यांना हितका धाडस येतो तरी कुठून ज्या पध्दतीने खुले आम दारूची विक्री केली जाते. परवाने, मान्यता नसलेली ही दारुविक्री संबंधित यंत्रणांना हप्ते न देता सुरू असते का? असा देखील प्रश्न निर्माण

होत आहे. हप्ते दिले जात नाहीत, असे गृहीत धरले तरी असे प्रकार राजरोसपणे कसे सुरू राहू शकतात. गावठी दारुविक्री, देशी, विदेशी दारूची बेकायदेशीर विक्रीला कुठे तरी आला बसण्याची गरज आहे. अवैध दारुविक्रीवर बंदी घालण्यासाठी पोलिसांकडून म्हणावे तितके सहकार्य मिळत नाही, अशी उत्पादन शुल्क विभागाची तक्रार असते. शिवाय गावोगावी

पोलिसपाटलांची नियुक्ती केलेली असते. गावातील अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांना देणे हे पोलिसपाटलांचे काम असते. दारूची बेकादेशीर विक्री होत नाही, असे एकही गाव नसेल. पोलिसपाटलांकडून याची माहिती पोलिस ठाण्यांना दिली जाते. त्यानंतर पोलिसांकडून कारवाई केली जाते. त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी संबंधित ठिकाणी दारूची विक्री सुरू होते. या प्रकारांची माहिती उत्पादनशुल्क मंत्री आणि गृहमंत्र्यांना नाही, यावर एखादा भाबडा माणूसच विश्वास ठेवू शकतो. अनेक ढाब्यांवर दारूची सर्रास विक्री केली जाते.

कोळी साहेब तुम्हाला माजलगावतील ग्रामीण भागाकडे लक्ष देण्याची गरज

माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागात अवैध दारूविक्रीचे प्रमाण खूप जास्त वाढले आहे. पायतळवाडी, मंगरूळ नं.१, राजेगाव, या सारख्या अनेक गावात दारूची विक्री खुले आम होत आहे. गावांतील अख्खी तरुण पिढी या व्यसनाच्या आहारी गेली आहे. १५ ते १६ वयोगटातील तरुण पासून ते वय वर्धा प्रयन्त या व्यसनाच्या आहारी गेली आहे. घरी एक वेळ भाकर नसली तरी चालेल पण सकाळी चहा च्या आधी दारू पिण्यासाठी लागते अश्या प्रकारे खुपजास्त प्रमाणात दारूची वेसण लागले आहे, या दारूमुळे कित्येक गावातील अखखेच्या अख्खे कुटुंब बरबाद झाले आहे. गावात किराणा दुकान कमी व दारूच्या दुकानी जास्त असल्याची गावोगावी चर्चा सुरू आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचा चढता आलेख लाख मोलाची मदत बाजीराव चव्हाण

मे महिन्यात ६० रूग्णांना ४०,७५००० हजार मदत शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड मदतीचा आधार.आडल्या नडलेल्या रुग्णांना मदतीला धावून जात शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपचारासाठी गरीब रुग्णांना आर्थिक आधार देत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संकल्पित या वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील गरजू रुग्णांना लाखोंची मदत करण्यात आली. असल्याची माहिती बीड जिल्ह्याचे धर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांनी दिली. पैशाअभावी आजारवरील उपचार थांबावा लागतो. आजारपणात गरीब रुग्ण उपचार घेण्याऐवजी आजारपणाशी संघर्ष करत असतात त्यांना हा संघर्ष करावा लागू नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष प्रभावीपणे कृतिशील व गतिशील केले आहे. याच कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू रुग्णांना अर्थसाह्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक मंगेश चिवटे यांच्यावर संबंधित कक्षेच्या जबाबदारी असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अनेक रुग्णसेवक निस्वार्थपणे कक्षाचे काम करत आहेत.जिल्ह्यातही या कक्षाचे काम वेगाने सुरू असून शिवसेना वैद्यकीय जिल्हा प्रमुख महादेव मतकर हे रुग्णांना उपचार खर्चात सवलत मिळवून देण्याचे कर्तव्य बजावत आहेत. बाजीराव चव्हण वैद्यकीय सहाय्यक यांच्या सहकार्यातून महिन्यात ४०,७५००० एवढी आर्थिक मदत रुग्णांना मिळवून देण्यात आली आहे.अशी माहिती बाजीराव चव्हाण यांनी दिली. अर्थसाह्यय मिळालेल्या रुग्णांची नावे पुढीलप्रमाणे१) रहीबाई गोविंद खेडकर, मेंदू रोग ५०००० हजार

२) सर्जेराव श्रीपती घुले, हृदयरोग १ लाख रुपये ३) पांडुरंग अभिमान आवारे,अपघात ५०००० हजार ४) बाबाजी जगन्नाथ बाभळ, हृदयरोग १००००० लाख ५) शिलाबाई विष्णू नागरगोजे, केमोथेरपी ५०००० हजार ६) कल्याण रामभाऊ मिसाळ,मेंदूरोग ५००००हजार ७) प्रियंका राहुल भविशन,नवजात बालक ५०००० हजार ८) शितल जगन्नाथ मानकर,नवजात बालक ५०००० हजार ९) कविता बाळू घोडके,नवजात बालक ५०००० हजार १०) प्रशांत महादेव थोरात, मेंदू रोग १००००० लाख ११) जयश्री सोमनाथ मरकड,नवजात बालक ५०००० हजार १२) बाळासाहेब गहिनीनाथ कांबळे,हिप रिप्लेसमेंट १००००० लाख १३) नवनाथ रंगनाथ बांगर, नी रिप्लेसमेंट१००००० लाख १४) दत्ता बाबुराव घिगे,अपघात ७५०००हजार १५) आरती संदीप धुमाळ,नवजात बालक ५०००० हजार १६) सुरेखा सुरेश दुधाळ,अपघात १०००००लाख १७) निकिता अजिनाथ वाघमारे, अपघात१००००० लाख १८) शहादेव महादेव जगदाळे,अपघात७५००० हजार १९) अर्जुन रामकिसन नाईकवाडे, हिप रिप्लेसमेंट १००००० लाख २०) आर्यन रवींद्र आदागळे,मेंदू रोग ५०००० हजार २१) पल्लवी रवींद्र टेकाळे नवजात बालक ५०००० हजार २२) अमर केशव साळवे मेंदू राव ५० हजार २३) छबुताई अनुसा शिंदे नी रिप्लेसमेंट ५०००० हजार २४) सुलोचना बाळू जाधव नवजात बालक पन्नास हजार २५) दगडूबाई मारुती शिंदे हृदयरोग ७५००० हजार २६) शकुंतलाबाई किसन कदम केमोथेरेपी पन्नास हजार २७) प्रशांत धनराज वाशिमकर अपघात एक लाख २८) फारूक जिलाबी तांबोळी अपघात ५००००



२९) राजेश राजू प्रसाद मिश्रा केमोथेरेपी पन्नास हजार ३०) तेजश्री शिरीष वाशिमकर नी रिप्लेसमेंट ५०००० ३१) प्रभावती गंगाराम पाटील अपघात एक लाख ३२) वैजनाथ सोपान पोकळे मेंदूराव ५०००० ३३) विनायक सुखदेव कांबळे हीप रिप्लेसमेंट ७५००० ३४) अरुण पितांबर पाटील अपघात एक लाख ३५) ज्ञानेश्वर ईश्वर गायके पन्नास हजार ३६) मनियार इब्राकली इक्राम हृदयरोग पन्नास हजार ३७) शांतीलाल राजू देदिया हृदयरोग एक लाख ३८) प्रतिभा विशाल खेडकर नवजात बालक पन्नास हजार ३९) पांडुरंग हरिदास गुरुकुदे हीप रिप्लेसमेंट एक लाख ४०) सकाळी मोहन निकम मेंदू रोग एक लाख ४१) सना मयूर शेख नवजत बालक ५० हजार ४२) बाळू किसन आगरकर मेंदू रोग पन्नास हजार ४३) साधना दत्तात्रय मावसकर नवजात बालक पन्नास हजार ४४) मनीषा पवन काळे नवजत बालक ५०००० ४५) अमृतराव श्रीरंग रसाळ हृदयरोग एक लाख ४६) निशा अमोल पंडित नवजात बालक ५०००० ४७) संगीता राम शिंदे मेंदू रोग ५०००० ४८) श्री नारायण संजय कदम मेंदू रोग एक लाख ४९) नंदनी विजय चादर नवजात बालक ५०००० ५०) शिवा सुरज घाडगे नवजात बालक एक लाख ५१) नवनाथ दत्तात्रेय गवते मेंदू रोग ५० हजार ५२) सचितानंद रामकृष्ण सोळुंके अपघात एक लाख ५३) बबनबाई केरबा कदम कर्करोग ८०००० हजार ५४) सुशाला गोपाळ बडे हृदयरोग एक लाख ५५) पायल रोहित पवळे नवजात बालक ५० हजार ५६) ज्ञानेश्वर बळीराम काकडे अपघात एक लाख ५७) धनंजय मारुती नरवडे अपघात ५०००० ५८) स्वाती शिवमहाते नवजात बालक ४५००० हजार ५९) निर्मला विठ्ठल मस्के नवजात बालक ५० हजार ६०) दामू श्रीरंग कोरडे हीप रिप्लेसमेंट एक लाख रुपयेगोरगरीब रूग्णांच्या हक्काचे ठिकाण म्हणजे धर्मवीर प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष-: बाजीराव (दादा) चव्हाण यांनी चालु केलेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड गरजु रुग्णांनी अवश्य संपर्क साधावा

पत्ता-:रेणु हॉस्पिटल समोर, मुक्ताई बिल्डिंग,धांडे नगर, बार्शी रोड बीड संपर्क क्रमांक -:९१४३७८७७७७/९१४३७१७७७७


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT